# निशाणी क्र.१६२ वरील आदेश
# (दि.२०.०९.२०२२ रोजी घोषीत)

. वादी यांनी प्रतिवादी क्र.२–भगवान शिवाजी काळे यांचे वारस अभिलेखावर समाविष्ट करण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या नुसार प्रतिवादी क्र.२–भगवान शिवाजी काळे हे दि. ०४.०९.२०२१ रोजी औरंगाबाद येथे वृध्दापकाळाने मयत झालेले आहेत. वादी यांना त्याबाबतची माहिती उशिरा प्राप्त झाली. तसेच वादी हे आजारी असल्यामुळे विहित मुदतीत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणण्यासाठी अर्ज दाखल करु शकले नाही. करीता त्याबाबत ०१महिना व ०३दिवस झालेला विलंब माफ करुन प्रतिवादी क्र.२–भगवान शिवाजी काळे यांचे वारस अभिलेखावर समाविष्ट करण्यासाठी प्रस्तुत अर्ज दि.०७.०१.२०२२ रोजी दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांचे म्हणणे मांडले. त्यानुसार वादीला प्रतिवादी क्र.२ यांच्या निधनाबद्यल संपूर्ण माहिती होती,तरी देखील त्यांनी विहित मुदतीत अर्ज दाखल केला नाही. तसेच त्यांनी विलंबा बाबत कोणतेही संयुक्तीक कारण नमूद केलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. प्रतिवादी क्र.१ यांच्या तर्फे कोणताही लेखीजबाब दाखल केलेला नाही.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,प्रतिवादी

क्र.२–भगवान शिवाजी काळे हे दि.०४.०९.२०२१ रोजी मयत झालेले आहेत आणि प्रस्तुत अर्ज हा दि.०७.०१.२०२२ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे निश्चितच अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला आहे. वादींनी सदरचा दावा हा वादग्रस्त मिळकतीचे मालक म्हणुन घोषीत करुन खरेदी–खत रद्यबातल करण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींच्या वारसांना अभिलेखावर समाविष्ट होण्याचा निश्चितच अधिकार प्राप्त होतो.

५. याशिवाय वादी यांनी अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे कारण अर्जात नमूद केलेले आहे. त्यामुळे सदर विलंब कालावधी ०१महिना व ०३ दिवस असल्याने प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर समाविष्ट केल्यास दोन्ही पक्षास गुणदोषावर दावा चालविणे योग्य होईल आणि प्रतिवादींना सुध्दा त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य ठरेल. वादींना त्यांची बाजू मांडण्याची संधी न दिल्यास त्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय हा गुणदोषावर निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.२ यांच्या कायदेशीर वारसांना अभिलेखावर समाविष्ट करण्यास झालेला विलंब माफीचा अर्ज,खर्च रक्कम रु.२००/–जिल्हा विधि सेवा प्राधीकरण,जालना यांच्या कार्यालयामध्ये भरणा करण्याच्या अटीवर मंजूर करणे न्यायोचित होईल. तेव्हा पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

# आदेश

१ वादींचा निशाणी क्र.१६२ वरील अर्ज खर्च रक्कम रु.२००/–जिल्हा विधि सेवा प्राधीकरण,जालना यांच्या कार्यालयामध्ये भरणा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२ आदेशाप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MADHURI RAMNARAYANSINHA KHANWE
Date: 2022.09.20 17:05:03 +0530

(श्रीमती माधुरी रा.खनवे)
दि.२०.०९.२०२२ २रे सह दिवाणी न्यायाधीश(व.स्तर)
जालना

**प्रमाणपत्र**

खालीलप्रमाणे निवेदन करण्यात येते की,सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :–देशमुख शिरीष दि.
न्यायालयाचे नाव :–२रे सह दिवाणी न्यायाधीश(व.स्तर),जालना.
पी.डी.एफ.दिनांक :–२०.०९.२०२२

लघुलेखक(म.)